# मालेगाव महानगरपालिका, मालेगाव
# प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 1.0

- **शासन निर्णय :-**

"सर्वासाठी घरे योजना 2022" शासन निर्णय क्र.प्रआयो-2015/प्र.क्र.110/गृनिधो-2(सेल) दिनांक 09 डिसेंबर 2015 अन्वये प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत मालेगाव महानगरपालिकेची निवड करण्यात आली आहे.

- मालेगाव महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यासाठी मा.महासभा ठराव क्र. 139 दिनांक 04/06/2016 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

- प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. 04 आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यास वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान (BLC/NC) अंतर्गत मालेगाव महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सादर केलेल्या एकुण ०६ सविस्तर प्रकल्प अहवालातील 1040 अंतिम पात्र लाभार्थ्यांना शासनाने मंजुरी दिली आहे.

- प्रधानमंत्री आवास योजनेत राज्य शासनाकडुन 1 लक्ष व केंद्र शासनाकडुन 1.5 लक्ष अनुदान अनुज्ञेय आहे.

- मंजुर 1040 लाभार्थ्यांपैकी 948 लाभार्थ्यांनी महानगरपालिकेस बांधकाम परवानगी सादर केलेली आहे. 948 लाभार्थ्यांना राज्य केंद्र शासनाचे प्राप्त अनुदान पैकी प्रथम टप्पा – 948 लाभार्थी , दुसरा टप्पा – 460 लाभार्थी , तिसरा टप्पा – 430 लाभार्थी व अंतिम टप्पा 206 लाभार्थी असे विविध टप्प्यात केंद्र व राज्य शासनाचे एकुण – 1632 लक्ष अनुदान मनपा मार्फ़त वितरीत करण्यात आले आहे.

- मालेगाव महानगरपालिका प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी सादर करुन अनुदान वितरीत लाभार्थ्यांपैकी **525** घरकुले पुर्ण असुन सदरील लाभार्थी आपल्या हक्काच्या पक्क्या घरात राहण्यासाठी गेलेल आहेत.

- उर्वरीत घरकुले विविध टप्प्यात प्रगतीत असुन त्यांना घरकुलाच्या बांधकाम प्रगतीच्या आधारावर अनुदान वितरणाची कार्यवाही सुरु आहे.